महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर  मेट्रो  रेल  प्रकल्प)

---

## कामठी आणि वर्धा मार्गावर कार्य गतीने करा : श्रावण हर्डीकर

## रेल विकास निगमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याना व्यवस्थापकीय संचालक यांचे आदेश




नागपूर : कामठी आणि वर्धा मार्गावर मेट्रोचे कार्य गतीने सुरु करा जेणेकरून लवकरात लवकर यामार्गावर मेट्रो सेवा सुरु करता येईल असे आदेश महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी रेल विकास निगमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मेट्रो भवन येथे आयोजित

आढावा बैठक मध्ये दिले. उल्लेखनीय आहे कि, महा मेट्रोने फ़ेज - २ संदर्भात विविध कार्याकरिता निविदा प्रसारित केल्या होत्या ज्यामध्ये रेल विकास निगम लिमिटेड या कंपनीला कंत्राट प्रदान करण्यात आले आहे. श्री हर्डीकर यांनी दिनांक २२ नोव्हेंबर २०२३ पासून ते आता पर्यंत ईको पार्क आणि कामठी महामार्ग या ठिकाणी रितसर सुरु झालेल्या कार्याचा आढावा घेत रेल विकास निगम लिमिटेडच्या अधिकाऱ्याना रिवाईज्ड प्लान पुनः तयार करण्याचे निर्देश देत निर्माण कार्याची गती वाढविण्याच्या सूचना दिल्या तसेच त्यांनी संबंधित अधिकाऱ्याना सूचना देत सांगितले कि फ़ेज - २ प्रकल्पाच्या निर्धारित वेळेपूर्वी निर्माण कार्य पूर्ण करण्यात यावे. ऑक्टोबर २०२५ पर्यंत कामठी मार्गिकेवर मेट्रो सेवा सुरु करता येईल त्या संबंधी कार्याला गती देण्यात यावी जेणेकरून नागरिकांना त्याचा फायदा होईल.

सदर बैठकीत व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प) श्री त्यागी यांना आरव्हीएनएल कडून सुधारित योजना पुनः तयार करण्यास सांगितले,आरव्हीएनएलने देखील वरिष्ठ पातळीवर कार्य गतीने करण्याची तयारी दर्शविली.

रेल विकास निगम लिमिटेड कंपनीला रिच - २ येथील ६.९२ किमी लांबीचा (आटोमोटिव्ह चौक ते लेखा नगर पर्यंतचा) एलिव्हेटेड व्हायाडक्ट ज्याची अनुमानित लागत ३९५ कोटी रुपये एवढी तसेच रिच - २ येथील ६ मेट्रो स्टेशन पिली नदी, खसारा फाटा,ऑल इंडिया रेडियो,खैरी फाटा,लोक विहार,लेखा नगर मेट्रो स्टेशनचा समावेश आहे या सोबतच रिच - १ येथील अँट ग्रेड सेक्शन (जमिनीस्तर) १ .९ किमी लांबीचा मेट्रो ट्रॅक आणि २ मेट्रो स्टेशन ईको पार्क आणि मेट्रो सिटी मेट्रो स्टेशनचा समावेश आहे ज्याची प्रस्तावित खर्च २५२ कोटी एवढी असून कार्याचा कालावधी ३० महिन्याचा आहे.

- **(आटोमोटिव्ह चौक ते लेखा नगर) :** आटोमोटिव्ह चौक ते लेखा नगर पर्यतच्या परिसरात मोठ्या प्रमाणात लोक वस्ती, शाळा, कॉलेज, ट्रान्सपोर्ट प्लाझा, असून या परिसरातील नागरिक शहरात मोठ्या प्रमाणात दररोज प्रवास करतात या भागात मेट्रो सुरु झाल्याने परिवहनाचे सुलभ असे साधन येथील नागरिकांना होणार आहे.

- **ईको पार्क आणि मेट्रो सिटी मेट्रो स्टेशन मुळे मोठ्या प्रमाणात मिहान येथील कंपनी,आयआयएम,एम्स हॉस्पिटल,नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट आदी परिसर थेट मेट्रोने जोडल्या जातील.**

- **नागपूर मेट्रो रेल फ़ेज  - २ प्रकल्पाची विशिष्टये :**

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फ़ेज  - २, ची लांबी ४३.८ कि.मी असून यामध्ये ३२ मेट्रो स्टेशनचा समावेश आहे. या प्रकल्पाची अनुमानित लागत ६७०८ कोटी एवढी आहे.

- **आटोमोटिव्ह चौक ते कन्हान :**

लांबी : १३ कि. मी. स्टेशन : पिली नदी,खसारा फाटा,ऑल इंडिया रेडियो,खैरी फाटा,लोक विहार,लेखा नगर,कॅन्टोन्मेंट,कामठी पोलीस स्टेशन,कामठी नगर परिषद,ड्रॅगन पॅलेस,गोल्फ क्लब,कन्हान नदी

- **मिहान ते बुटीबोरी ईएसआर :**

लांबी : १८.७  कि. मी. स्टेशन: ईको पार्क स्टेशन,मेट्रो सिटी स्टेशन,अशोकवन,डोंगरगांव,मोहगांव,मेघदूत सिडको,बुटीबोरी पोलीस स्टेशन,म्हाडा कॉलोनी,एमआयडीसी – केईसी,एमआयडीसी - ईएसआर

- **प्रजापती नगर ते ट्रांसपोर्ट नगर :**

लांबी : ५. ५ कि. मी. , स्टेशन: पारडी,कापसी खुर्द, ट्रांसपोर्ट नगर

- **लोकमान्य नगर ते हिंगना:**

लांबी :  ६.६ कि. मी. , स्टेशन: हिंगना माउंट व्ह्यू,राजीव नगर,वानाडोंगरी,एपीएमसी,रायपूर,हिंगना बस स्टेशन,हिंगना.